# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
दूरध्वनी क्र. ०२०–२५६०११४३, २५६०११४२, टेलिफॅक्स २५६९७५११

संदर्भ: विक्रीमं/वर्धापनदिन/११३५ दिनांक: २८ जानेवारी, २०१९.

## परिपत्रक

सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना कळविण्यास आनंद होतो की, यावर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळामार्फत सेवकांसाठी **दि. ०६ ते ०८ फेब्रुवारी, २०१९** दरम्यान क्रिकेट, फनी गेम्स व महिलांसाठी थ्रो बॉल स्पर्धाचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी सर्व विभागांच्या संघानी आपल्या संघाच्या प्रवेशिका **०१ फेब्रुवारी, २०१९ दुपारी ०२.०० पर्यंत** क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ कार्यालयामध्ये जमा करून सहकार्य करावे. उशीरा येणाऱ्या संघाच्या प्रवेशिकांचा विचार करण्यात येणार नाही.

| क्र | स्पर्धेचा प्रकार | नियम व अटी (स्पर्धेचे स्थळ :– गेस्टहाऊस मागील मुख्य मैदान) |
|---|---|---|
| १ | क्रिकेट (मिश्र) | १. प्रत्येक विभागाचा फक्त एकाच संघास प्रवेश देण्यात येईल.<br>२. प्रत्येक विभागाच्या संघाची प्रवेशिका विभागप्रमुख यांच्यामार्फत सादर करणे आवश्यक आहे.<br>३. संघामध्ये ११ खेळाडूंपैकी ८ पुरूष व ३ महिला खेळाडूंचा समावेश असेल.<br>४. सामने ८ षटकांचे राहतील.<br>५. प्रत्येक गोलंदाजास फक्त ०२ षटके मर्यादित असतील.<br>६. संघाने सामन्यापूर्वी १५ मिनिट अगोदर मैदानावर उपस्थित रहावे.<br>७. सामने सकाळी ९ ते ११ व दुपारी २ ते ६ यावेळेत होतील.<br>८. पंचांचे निर्णय अंतिम राहतील. |
| २ | थ्रोबॉल (फक्त महिलांसाठी) | १. प्रत्येक विभागाचा फक्त एकाच संघास प्रवेश देण्यात येईल.<br>२. प्रत्येक विभागाच्या संघाची प्रवेशिका विभागप्रमुख यांच्यामार्फत सादर करणे आवश्यक आहे.<br>३. संघामध्ये १२ महिला खेळाडू असतील त्यापैकी ६ महिला खेळाडू प्रत्यक्ष मैदानामध्ये सहभाग घेतील व ६ महिला खेळाडू राखीव असतील.<br>४. संघाने सामन्यापूर्वी १५ मिनिट अगोदर मैदानावर उपस्थित रहावे.<br>५. सामने सायं ३ ते ६ यावेळेत होतील.<br>६. पंचांचे निर्णय अंतिम राहतील. |
| ३ | फनी गेम्स | संगीत खुर्ची, तीन पायाची शर्यत, Sweet Eating प्रथम पुरूष गटाच्या स्पर्धा होतील व त्यानंतर महिला गटाच्या स्पर्धा आयोजित करण्यात येतील. |

**टिप :– १) क्रिकेट व थ्रोबॉल स्पर्धाचे भाग्यचक्र दि. ०१ फेब्रुवारी, २०१९ रोजी दु. ०४. ०० वा. क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ कार्यालयामध्ये संघनायकांसमोर टाकण्यात येतील. २) स्पर्धा उद्घाटन कार्यक्रम समारंभ बुधवार, दि. ०६ फेब्रुवारी, २०१९ रोजी दु. २.३० वाजता मुख्य मैदानावर आयोजित करण्यात येणार आहे. ३) सदरची स्पर्धा ही सध्या विद्यापीठात कार्यरत असलेल्या सर्व समावेशक सेवकांसाठीच असेल. ४) ज्या विभागांची सेवक संख्या ही १० पेक्षा कमी असेल, अशा विभागांच्या सेवकास सांघिक खेळाकरीता एकत्रित संघ करण्याची मुभा असेल, ही मुभा १० पेक्षा जास्त सेवक कार्यरत असलेल्या विभागास लागू असणार नाही.**

28.01.19

संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ